Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 1.9508(UIF)
Volume-3, Issue-7, Jan-2014
Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# जातीय दहशतवाद: एक समाजशास्त्रीय अभ्यास

संजय हिंदुराव संदे

स.म.शं.मोहिते पाटील महाविदयालय, रहिमतपूर.ता. कोरेगाव, जिल्हा - सातारा.

**सारांश** - जगामध्ये दहशतवादाचा उदय केव्हा झाला. कशा प्रकारे झाला याचा अद्याप उलघडा झालेला नाही. पहिल्या महायुद्धापूर्वी रशियन राजा झार निकोलस (दुसरा) यांच्या विरोधात जो उद्रेक उसळला होता. त्या वेळी काही दहशतवादाचे प्रकार घडले होते. त्यानंतर जर्मन, रोमन विरुद्ध ग्रीक यांच्यामध्ये दहशतवादाचे प्रकार घडले आहेत पण त्या कालखंडात दहशतवादा हा शब्द वापरला जात नसे. किंवहूना हया शब्दाची ओळख जगाला नव्हती.

## प्रस्तावना-

१६ व्या शतकात फान्समध्ये ख्रिश्चनांच्या विरोधी हल्ले करणे, हत्या करणे, बायकांना पळविणे, असे प्रकार घडले होते. मुस्लिम दहशतवादी आपली जनतेवर वचक बसवण्यासाठी सापडेल त्याला धर्म आज्ञेनुसार शिक्षा न देता फासावर लटकवणे, हातपाय तोडणे, मुंडके धडा वेगळे करणे, मोठया उकळत्या पाण्याच्या किंवहूना तेलाच्या कढईत ढकलून देणे अशा क्रूर शिक्षा जाहिररित्या दिल्या जात होत्या. शिवाय गुरासारखे राबवून घेणे, गुलाम बनविणे त्यामुळे राजाच्या विरोधात कोणीही अपशब्द काढत नसे, अशा प्रकारे जगाच्या पाठीवर राजसत्तेकडून अनेक ठिकाणी दहशतवाद पसरविला जात होता.

दहशतवार हा शब्द प्रयोग गेल्या दशकापासून वापरलेला दिसतो तो ९/११ च्या अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड वरील हल्यानंतर हा शब्द अधिक वापरला जाऊ लागला आहे.

दहशतवादाची व्याख्या:-

अमेरिकेच्या संघराज्यीय गुन्हा अन्वेषण विभागाने ( F.B.I.) ने केलेली.

"आपल्या राजकीय आणि सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्याकरिता व्यक्तीविरुद्ध मालत्तेविरुद्ध शासन किंवा नागरी समुदाय किंवा त्यांचा अंश यांच्यात दहशत निर्माण करण्याकरिता किंवा त्यांच्यावर जबरदस्ती करण्याकरिता अवैध हिंसाचाराच्या अगर बळाचा वापर म्हणजेच दहशतवाद होय."

भारतात अनेक स्थित्यांतरे झाली. जात, जमात, वंश, पंथ, यांना महत्व प्राप्त झाले. धर्मग्रंथ, स्मृती, पुराणे, मनुस्मृती, वेद, उपनिषदे यांना पवित्र मानले जाऊ लागले, धर्म मार्तंडांना महत्व प्राप्त झाले. त्यामुळे हजारो वर्षाच्या काही बुरसट परंपरेने चालत आलेल्या मानवा मानवामध्ये भेद करणाऱ्या निष्ठा, श्रद्धा, धार्मिक आचार, कर्म, जातीभेद अशा काही समजूती यांना नव्याने उजाळा मिळाला त्याचा एकत्रित परिणाम म्हणजे धार्मिक कर्मट मुलतत्वादी प्रथा, रुढी यांनी सामाजिक जीवन अनेक परंपरेने बंदिस्त केले. भारतातील अनुसुचित जातीच्या लोकांना या पारंपारिक कर्मठ प्रथा व रुढी मुळे अमानुष वागणूक देऊन नेहमी कोणत्या न कोणत्या कारणांनी अतोनात छळ केला जात असे त्यांना सार्वजनिक ठिकाणच्या पिण्याच्या पाण्यालाही स्पर्श करु दिला जात नसे, चांगले घर बांधावयांचे नाही. चांगले कपडे परिधान करावयाचे नाही. कोणता व्यवसाय करावयाचा हे ही निश्चित होते. त्यांनी राहणीमानात बदल करावयाचा नाही व ती परंपरा त्यांच्या मुलांनी तशीच चालवायची एवढेच काय उच्च जातीतील व्यक्तीला स्पर्श सुद्धा करायचा नाही, देवळातो प्रवेश करायचा नाही, रस्त्यातून जाताना समोर एखादा ब्राम्हण आला तरी रस्त्यांच्या खाली उतरुन थांबवयाचे म्हणजे अनुसुचित जातीच्या व्यक्तीची सावलीचाही स्पर्श बिटाळ समजला जात असे. अशा प्रथा परंपरांना धार्मिक मान्यता प्राप्त होत्या त्या आधारे जर एखादया विरोधी

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 1.9508(UIF)
Volume-3, Issue-7, Jan-2014 Available online at www.aygrt.isrj.net

वर्तन केल्यास प्रचंड मारहाण प्रसंगी खुन, बायकांच्यावर बलात्कार, समाज बहिष्कृत अशा कडक शिक्षा देवून हिंदू समाज व्यवस्थेने अनुसूचित जातीवर सामाजिक दहशत बसविली होती. आज ही ती दहशत या ना त्या करणांनी नव्यान उभी रहात असलेली आढळते.

संशोधक पद्धती :-

संशोधन पद्धतीत तथ्य संकलन दुय्यम स्त्रोत पद्धतीने केलेले आहे.

उद्देश:-

१. जातीय दहशतवादीची पर्श्वभूमी अभ्यासणे.
२. जातीय दहशतवादाचे स्वरुप अभ्यासणे.
३. जातीय दहशतवादाचे परिणाण अभ्यासणे.
४. समाजभिमुख मानवतावादाची व्याप्ती वाढविणे.

जातीय दहशतवाद प्राचिन कालखंडापासून चालत आलेला आहे. द्रोणाचार्य यांनी एकलव्याला दिलेली शिक्षा हा त्यांतीलच एक प्रकार आहे अनुसूचित जातीच्या लोकांना शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, राजकिय सर्व दृष्टीकोनातून जाणिवपूर्वक वंचित ठेवण्याचे धर्माच्या आधाराने राबवले जात होते. जीर्ण रुढींना पवित्र मानून रुढीच्या आवर्तात जीवनाचे अंतिमत्व शोधणाऱ्या आणि त्यातच समाधान मानणाऱ्या जातीपातीचे कडक निर्बंध पाळणाऱ्या श्रेष्ठ कनिष्ठ अहंभाव बाळगणाऱ्या लोकसमुहाचे आठाव्या एकविसाव्या शतकातही जिवंत आहे म्हणूनच माणसाचे स्वातंत्र्य आणि त्याचे मूल्य संस्कृतीच्या आडोश्याने नाकारणारी प्रकृती जातीवादी दहशतवादाचेच प्रच्छन्न रुप होय.

दहशतवाद म्हणजे हृदय विशेषत: कनिष्ठ जातीच्या निरापराध नागरीकांची स्त्रियानमुळे यांची निदर्य कत्तल ज्यांचा काही अपराधा नाही जे आहेत त्यांना लाटी काटी किंवा गोळया घालून ठार मारणे गावातून नग्न धिंड काढणे, सर्व गावांनी मिळून ठेचून मारणे, संपूर्ण जातीची घरे पेटवणे हा जातीय दहशतवाद म्हणजे भेकडपणे, माणुसकीला काळिंवा फासणारा निदर्य वेडेपणा.

पण निर्घुण वेडेपणात सुद्धा एक पद्धत आहे हे विसरुन चालणार नाही. प्रस्थापित उच्च जातीचे वर्चस्व कायम टिकावे जाती भेदाचे अस्तित्व अबाधित रहावे हा या सर्व कृत्यामार्ग उद्देश असतो.

दहशतवाद हा एक प्रकारे अघोषित व अनियमित हिंस्साचाराचा प्रकार आहे. तो केव्हा कुठे व कसा उग्ररुप धारण करेल हे कळत नाही. त्याच प्रमाणे बहुतेक वेळा हा हल्ला आपल्या आयुष्यांचा गाडा कसाबसा रेटणाऱ्या गरीब निरापराधी लोकांच्यावर अचानकपणे केला जातो, या हल्यात उच्च जातीचे लोक सहभाग घेतात परिणामी क्षणात हसत खेळत असलेल्या लोकामध्ये हलकल्लोळ माजून तेथे जाळपोळ प्रचंड मारहाणी तुटलेले हातपाय, फुटलेली डोकी, छिन्नविछिन्न झालेली शरीरे वाहत असलेले रक्ताचे पाट व दु:खाने केलेल्या हृदयाचे पाणी पाणी करणारा आक्रोश पहावयास मिळतो हे लक्षात घेता आजपर्यंत मनुष्यहाणी वित्तहाणी, लाखोघराची बेचिराख किती मोठ्या प्रमाणात होत आलेली आहे परिणामी अनुसूचित जातीच्या लोकांची कि दैनिय अवस्था होत असेल याची कल्पना न करणे बरी. माणसा-माणसा वर माणसाप्रमाणे प्रेम करा. दया, करुणा याचे पालन करा ही समतावादी वृत्ती कुठे लुप्त झाली असेल हा एक संशोधनाचा विषय आहे.

जातीय दहशतवादाचे स्वरुप व परिणाम

जात ही, जन्माने प्राप्त होत असल्यामुळे तिचे स्वाभाविक बंधने मानवी एकसंघतेला मारक ठरु लागले याचे कारण जातीत बदल होऊ शकत नाही. जात ही जशी सोडता येत नव्हती, तसाच जातीच्या वाट्याला आलेला व्यवसायही बदलता येत नव्हता व्यापार करणाऱ्या माणसास किंवा त्यांच्या जातीस ज्ञान संपादन करता येत नसे. सेवा करणाऱ्यास व्यापार करता येत नव्हता सर्वच वर्णांसाठी व जातीसाठी हा नियम होतो. त्यामुळे समाजात कसल्या प्रकारची देवाण-घेवाण होत नसे. रोटी-बेटी व्यवहार केवळ जातिअंतर्गत होत असल्याने या समाजात बंद वर्गाचे स्वरुप प्राप्त झाले. जातीत जन्म, जातीतच विवाह, जातीतच मरण ह पुण्यकर्म असल्याचे दाखले पुराणकथा, महाकाव्य, स्मृती, इ. ग्रंथातून दिले जात होते. त्यामुळे धर्मग्रंथ पवित्र ठरले, त्यात सांगितले की गोष्ट सत्यच आहे, यावर वरीष्ठ जातीची दृढ श्रद्धा असल्यामुळे जाती पद्धतीला विरोध, किंबहुना एखादे कृत्य तो धार्मिक दृष्टया पाखंडी व गुन्हेगारी ठरु लागला त्याला शिक्षा दिलीच पाहीजे असा समाज व्यवहार बनला. मनुस्मृती या ग्रंथांनी तर कडक नियमच तयार करुन जात्यांतर करणाऱ्यास विविध प्रकारच्या शिक्षा सांगितल्या आहेत. मनस्मृतीने स्त्री, शुद्र यांनी संपत्ती बाळगण्याचा हक्क नसल्याचे जाहिर केले, त्यामुळे

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 1.9508(UIF)
Volume-3, Issue-7, Jan-2014 Available online at www.aygrt.isrj.net

हिंदू समाजात स्त्री-शुद्रांची स्थिती जनावरापेक्षा ही वाईट झाली. स्त्री ही केवळ भोगवस्तू एवढीच तिची किंमत होती. लहानपणी वडिलांनी, तरुणपणी नवऱ्याने, म्हातारपणी नवऱ्याने, म्हातारपणी मुलांनी तिचा संभाळ करावा परंतु तिला स्वातंत्र्य देता कामा नये असा मनूने नियमच करुन ठेवला त्यामुळे स्त्रियांच्या वाटयाला गुलामगिरी आली. ज्यांनी या व्यवस्थेला न स्विकारता संघर्ष केला ते हिंदू समाजाच्या चौकटीवाहेर फेकले गेले.

जातीय दहशतवादी कृत्यातून आजही हिंसक अत्याचार घडत आहेत. त्यापैकी २००९ मधील काही थोडक्या घटना व त्याचे स्वरुप

१. २९ सप्टेंबर २००६ रोजी भंडारा जिल्हयातील खैरलांजी गावातील शेतातील पायवाटेवारुन गावातील लोकांशी झालेला किरकोळ स्वरुपाचे भांडण, त्यामध्ये मातंग तरुणांनी थोडाप्रतिकार केला त्याचा राग सर्वांना आला परिणामी भौतमांगे कुटुंबातील कॉलेजला जात असलेली मुलगी सुरेखावर अचानक हल्ला केला. तिला विवस्त्र करुन घरापर्यंत फरपटत आणले, सायकल चेन्स, काटयाचे घाव व दगडांचा ढेच दिला संपूर्ण कुटुंबाला बेदम मारहाण करुण सुरेखावर बलात्कार केला. निघृणतेचा कळस की काय सुरेखाचे वस्त्रहीन प्रेत गावातल्याच कालव्याच्या दिशेने फेकून दिले आणि नितीमत्ता, सहदयता, दुःख कणव, पश्चाताप हे सारे शब्द कोशातून हदपार झाले. यासर्व प्रकरणात भौतमांग सर्व कुटुंबाचा क्रूर छळ केला हे कृत्य उच्च समाजातल्या जातीतल्या नराधमानी केले. संपूर्ण गावच हिंदुत्वाच्या प्रभावाखाली होते कोणी आव्हान देण्याचे धाडस करत नव्हते इतकी दहशत जातीवादयांनी बसवली होती.
२. (दि.१६ ऑगस्ट २००९ रोजी घडयाळाला मतदान केले नाही म्हणून दलितावर हल्ला) मुक्ताईनगर निमखेडी खुर्द येथे राष्ट्रवादीच्या घडयाळास मतदान केले नाही म्हणून दोन दलित महिलासह तिघांना जबर मारहाण व जातीवाचक शिवीगाळ करुन बौद्धाची घरे पेटवली दहशत पसरवून अनेक बौद्धांना मतदानापासून वंचित ठेवले.
३. दि. २६ ऑगस्ट २००९ (रणापूर) जिल्हा लातूर येथील रणापूर पासून ७ कि.मी. अंतरावर असलेल्या पांढरी (खरोळा) येथील चर्मकार समाजाचे कुटुंबाचे १५ वर्षापूर्वी राऊत यांची जमिन विकत घेतली होती ती कोणतीही रक्कम न घेता परत करावी म्हणून कुटुंबातील ४ व्यक्तीस व ३ स्त्रियांना जबर मारहाण करुन घर ही पेटवून दिले. त्यामध्ये दोन म्हशी, शेळया, कोंबडया, शेती अवजारे व संसारपयोगी वस्तू जळून खाक तक्रार केल्यात समाज बहिकृत करण्याची धमकी.
४. दिनांक ३० ऑक्टोंबर २००९ कर्नाटकात बेळगाव जिल्हयात मोळे (ता.अथणी) गावी बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळयाला सर्कल बांधणेसाठी आंदोलन करतात म्हणून बौद्धांवर गावाने बहिष्कार टाकला बौद्ध कुटुंबांना सार्वजनिक सेवा बंद केल्या, रेशन, पाणी बीज वैद्यकीय या सर्वसेवा बंद केल्या जर कोणी बौद्धास मदत केलीतर १००० रुपये दंड व समाज बहिष्कृत केले जाईल अशी धमकी गावात सर्वत्र दहशतवादी वातावरण.
५. २७ डिसेंबर २००९ (सार्वजनिक पाणवटयावर दलितांना पाणी भरण्यास मज्जाव) वसमत तालुक्यातील वाघी गावातील सार्वजनिक पाणवटयावर पाणी भरण्यास मज्जाव केला पाणी भरले म्हणून बौद्धांना बेदम मारहाण वाळीत टाकण्याची धमकी गावात सर्वत्र दहशतवादी वातावरण.
६. ३१ ऑक्टोबर २००९ महाड तालुक्यातील काले येथील एका अल्पवयीन दलित मुलीवर अत्याचार ३१ ऑक्टोबर २००९ रोजी शाळेत जात असताना एका विकास योजनेतून तुला सायकल घेऊन गेले व त्यासाठी त्या विषयक फॉर्म भरावयाचा आहे असे सांगून ८वीत शिकणाऱ्या मुलाला घेऊन गेले व बलात्कार केला सदर घटनेची वाच्छता अगर तक्रार कोठेही दयावची नाही, अन्यथा एके ही हात जागेवर ठेवला जाणार नाही गावातून हाकालपट्टी व बहिष्कृत केले जाईल अशी धमकी देऊन दहशत पसरवली आहे.

निष्कर्ष :-

दहशतवाद हा राजकीय दृष्टीकोनातूनच घडतो असे नाही दहशतवाद हा सामाजिक,धार्मिक जातीय भाषिक, राजकीय, नक्षलवाद, सांस्कृतीक, जैविक कौटुंबिक दहशतवाद अशा अनेक बाजूंनी जोडला गेलेला आहे.

भारतीय प्राचीन कालखंडापासून विषमता धिष्टीत समाजव्यवस्था निर्माण केलेली आहे. तिचा उगम केव्हा झाला हे नेमके पणाने सांगता येत नसेल तरी वेदकालापासून अस्पृश्यतेची बीजे रुजलेली सापडतात. ती आजही २१ व्या शतकात पहावयास मिळतात अस्पृश्य जातीच्या लोकांनी सुवर्णांजातीच्या लोकांशी स्पर्धा किंवा न्याय हक्क बाबत संघर्ष ही करावयाचा नाही याला काही जातीवादी वृत्तीच्या लोकांच्या समाजाचा पाठींबा असतो. त्यामुळे कायदा असून त्याचे अस्तित्व नसल्यासारखे होते. या जातीवादी दहशतवादातून आजपर्यंत लाखो लोकांचे जीव घेतले आहेत. शेकडो लोकांना हात पाय, डोळा गमवावा लागला आहे. लाखो कुटुंबाची घरे बेचिराख झाली आहेत. अशा अमानुष दशहतवादी घटनांनी इतिहास नोंदवला गेला आहे.

भारतीय समाजाने लोकशाही प्रधान व्यवस्था स्विकारली आहे समाता, बंधुता, स्वातंत्र्य, या मूलभूत गोष्टी पासून कोणत्याही जाती जमातीची व्यक्ती वंचित राहून नयेत जे लोक किंवहुना जो समाज जातीय दशहतवादी कृत्य करतो अशा व्यक्तीस किंवहुना समाजाला कडक शासन करावे

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 1.9508(UIF)
Volume-3, Issue-7, Jan-2014 Available online at www.aygrt.isrj.net

समाजातील विज्ञाननिष्ट, मानवतावादी, वृत्तीच्या लोकांनी जातीभेद बाबतचा गैरसमज समाजविषमता या विषयी जाहिर मत, लेख, चर्चासत्र याद्वारे करावे.

जातीविद्वेश थांबला पाहिजे जातीविहीन समाज निर्माण झाला पाहिजे खऱ्या अर्थाने भारत एकसंघ होणे गरजेचे आहे. यासाठी जातीय दहशतवादी कृत्य करणाऱ्या व्यक्तीवर समाजाने नियंत्रण देवून अशा व्यक्तींनी समाजाने पाठींबा देऊन नये तरच दहशतवादी समाजापासून संरक्षण होईल.

संदर्भ ग्रंथ :-

१. सत्याग्रही :- जानेवारी २०००
२. एकविसाव्या शतकातील दहशतवाद :- प्रा.म.न.उदगावकर
३. अस्मितादर्श :- २००६
४. साप्ताहिक सकाळ :- ९ फेब्रुवारी २००९
५. दै. सम्राट :- १६ ऑक्टोबर २००९
६. दै. सम्राट :- २६ ऑक्टोबर २००९
७. दै. सम्राट:- ३० ऑक्टोबर २००९
८. दै. सम्राट:- २७ डिसेंबर २००९
९. दै. सम्राट :- ३१ डिसेंबर २००९